महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्लॉट क्र. जी–९, प्रकाशगड, बांद्रा (पुर्व), मुंबई–४०००५१

संकेतस्थळ: www.mahadiscom.in

## जाहीर सूचना

**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (महावितरण कंपनी) दिनांक २८.०३.२०२५ रोजी निर्गमित केलेल्या बहुवर्षीय वीजदर आदेशाच्या (प्र. क्र. २१७/२०२४) पुनर्विलोकनासाठी व सुधारित वीजदरांसाठी मा. आयोगासमोर दाखल केलेल्या पुनर्विलोकन वीजदर याचिकेवर सुचना/हरकती /अभिप्राय मागविण्याकरीता (प्र.क्र.७५/२०२५)**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितने (महावितरण कंपनी) आर्थिक वर्ष २०२२–२३ व आर्थिक वर्ष २०२३–२४ चे अंतिम अचूक समायोजन, आर्थिक वर्ष २०२४–२५ चे तात्पुरते समायोजन व आर्थिक वर्ष २०२५–२६ ते आर्थिक वर्ष २०२९–३० साठी सुधारित एकुण महसुलाची गरज, सद्याचे वीजदर व शुल्क, यातुन अपेक्षित महसूल, अपेक्षित महसूलातील तुट आणि प्रस्तावित वर्गवारी निहाय वीजदर यांचा सुधारित अंदाज यासाठी बहुवर्षिय वीजदर याचिका पाचव्या नियंत्रण कालावधीकरिता (प्र.क्र.२१७/२०२४) मा. आयोगास सादर केली होती. मा. आयोगाने सदर बहुवर्षिय वीजदर याचिकेवर (प्र.क्र.२१७/२०२४) दि. २८ मार्च, २०२५ रोजी आदेश दिला.

त्यानंतर महावितरण कंपनीने दिनांक २८ मार्च, २०२५ रोजीच्या बहुवर्षीय वीजदर आदेशामधील काही मुद्द्यांबाबत पुनर्विचार करण्यासाठी, पुनर्विलोकन याचिका (प्र. क्र. ७५/२०२५) मा. आयोगासमोर सादर केली होती. मा. आयोगाने सदर पुनर्विलोकन याचिकेवर दिनांक २५ जून, २०२५ रोजी आदेश जारी केले.

दिनांक २५ जून, २०२५ रोजी दिलेल्या सदर पुनर्विलोकन आदेशाविरुद्ध मा. मुंबई उच्च न्यायालयासमोर याचिका दाखल करण्यात आली. मा. उच्च न्यायालयाने दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे, मा. आयोगाने दिलेल्या दिनांक २५ जून, २०२५ रोजीचा आदेश रद्द करून, मा. आयोगाला महावितरण कंपनीची पुनर्विलोकन याचिकेवर परत सर्व भागधारकांचे सूचना/हरकती घेऊन नव्याने निर्णय देण्याचे आदेश दिले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या आदेशाद्वारे मा. आयोगाला १२ आठवड्यात पुनर्विलोकन याचिकेवर आदेश जारी करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदरील आदेशाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने या जाहीर सूचनेद्वारे पुनर्विलोकन याचिकेसंबंधात (प्र.क्र.७५/२०२५) जनतेकडून सूचना / हरकती/ अभिप्राय मागवाव्यात, असे मा. आयोगाचे निर्देश आहेत. सदर पुनर्विलोकन याचिकेमध्ये (प्र.क्र. ७५/२०२५) महावितरण कंपनीद्वारे, बहुवर्षीय वीजदर आदेशामधील (प्र.क्र.२१७/२०२४) काही स्पष्ट त्रुटी दर्शविण्यात आल्या आहेत.

पुनर्विलोकन याचिकेमधील महत्वाचे मुद्दे व त्या मुद्यांमध्ये झालेल्या कथित त्रुटींमुळे महावितरण द्वारे मुद्देनिहाय अंदाजित केलेले आर्थिक परिणामाचे तपशील खालील तक्त्याप्रमाणे दर्शविण्यात आले आहेत.

| अ. क्र. | तपशिल | मापनाचे युनिट्स (एकक) | परिणाम |
|---|---|---|---|
| **A.** | **भांडवली खर्चाची (Capex) परवानगी नकारल्यामुळे महावितरणच्या एकुण महसूलावर (ARR) परिणामाची गणना.** | | |
| i. | चौथ्या व पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी मंजूर DPR योजनांमुळे झालेले परंतु मंजूर न केलेले भांडवलीकरण चा परिणाम | रु.कोटी | ४,७२२.५१ |
| ii. | चौथ्या व पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी १००% अनुदान व ग्राहक योगदानातून राबविले जाणाऱ्या योजनामुळे झालेले परंतु मंजूर न केलेले भांडवलीकरणाचा परिणाम | रु.कोटी | १,५८२.५४ |
| iii. | DPR सादर केलेले भांडवल योजनांचे मंजूर न केलेले भांडवलीकरणाचा परिणाम | रु.कोटी | ४९,३१९.४६ |
| | **एकुण** | **रु.कोटी** | **५५,६२४.५१** |
| **B** | **आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी चुकीने मंजूर न केलेले एकुण वीज खरेदी खर्चाचा परिणाम** | रु.कोटी | ६,०५७ |
| **C** | **पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी वीज खरेदी खर्च** | | |
| i. | पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण वीज विक्रीच्या अंदाजामध्ये झालेली चुक व त्याचा परिणाम | द.ल.यु. | ५४,०९४ |
| ii. | मा. आयोगाच्या वीज खरेदी मॉडेलमधील चुकीचा परिणाम | रु.कोटी | ६९,८२४ |
| iii. | वीज खरेदी खर्चाचा अंदाज व त्याच्या निर्धारणातील इतर चुका | | |
| | a) मा. आयोगाने बहुवर्षिय वीजदर आदेशामध्ये महानिर्मितीसाठी (MSPGCL) मान्य केलेल्या थर्मल (औष्णिक) स्टेशनसाठी मंजूर केलेल्या अस्थिर दर / वीज दरामध्ये विसंगती आणि स्पष्ट चुकांचा परिणाम | रु.कोटी | ९८.१५ |
| | b) मा. आयोगाच्या बहुवर्षिय आदेशात MSPGCL प्रकल्पांसाठी मंजूर केलेल्या ECR वर FGD च्या रिएजेंट खर्चाचा मंजूर न केलेला परिणाम | रु.कोटी | ३,०५६.७१ |
| | c) MSPGCL च्या लघु जलविद्युत प्रकल्पामधून मंजूर वीज खरेदी खर्चाची गणना करण्यात झालेल्या चुकीचा परिणाम | रु.कोटी | १,३२२.१४ |
| | d) आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी GMR इन्फ्रा साठी चुकीचे अस्थिर आकार ग्राहय धरुन चुकीची गणना केलेले वीज खरेदी खर्चाचा परिणाम | रु.कोटी | ६.४८ |
| **D** | **कृषी वर्गवारीसाठी गणना केलेली, वीज विक्री मधील चुक ;<br>मंजूर न केलेली तांत्रिक हानि व त्याचा कृषीचा वीज विक्री निर्देशांकावर झालेला परिणाम** | | |
| | आर्थिक वर्ष २०२२–२३ च्या अंतिम अचुक समायोजन मध्ये नफा/ नुकसान च्या समभागावर परिणाम | रु.कोटी | २,३२४ |
| | आर्थिक वर्ष २०२३–२४ च्या अंतिम अचुक समायोजन मध्ये नफा/ नुकसान समभागावर परिणाम | रु.कोटी | ९४८ |
| E | Time of Day (ToD) वीजदर पुर्नरचना मधील व बँकींग मधील तरतुदींबाबत चुकीचे निष्कर्ष | – | – |
| F | आर्थिक वर्ष २०२२–२३ व आर्थिक वर्ष २०२३–२४ करिता वायर वितरण व्यवसायसाठी मंजूर न केलेल्या भाग भांडवलावरील परताव्याचा परिणाम | रु.कोटी | ३८२.५२ |
| G | हॉटेल्स व्यवसायकांचे चुकीचे वर्गीकरण व त्यांना होणाऱ्या फायदयांचा परिणाम | रु.कोटी | ८५४.९२ |
| H | महापारेषण कंपनीने (MSETCL) अतिउच्चदाब जाळे न उभारल्यामुळे महावितरण कंपनीच्या काही अतिउच्चदाब ग्राहकांना वहन आकारामध्ये फायदा मिळणे | रु.कोटी/वर्ष | १२७.१५ |
| I. | संचालन व सुव्यवस्था (O&M) खर्चाची गणना करताना अनुदान व ग्राहक योगदानामुळे स्थापन झालेले मालमत्तेचा विचार न केल्यामुळे झालेला परिणाम | रु.कोटी | ८,३०९.२७ |
| J | मंजूर न केलेल्या खेळत्या भांडवलावरील व्याज | – | – |
| K | आर्थिक वर्ष २०२२–२३ ते आर्थिक वर्ष २०२४–२५ साठी व तसेच पाचव्या नियंत्रण कालावधीसाठी घसारा खर्चाची गणना करताना ग्राहय धरलेल्या चुकीच्या घसारा दरामुळे झालेला परिणाम | – | – |
| L | मंजूर न केलेला ग्रीड सहाय्य आकार | – | – |
| M | अनिवार्य नसलेल्या घटकांना पुरविण्यात येणाऱ्या हरित उर्जेसाठी हरित उर्जा पुर्तता (RPO) करण्याचे बंधन चुकीने काढून टाकल्यामुळे झालेला परिणाम. | – | – |
| N | आर्थिक वर्ष २०२२–२३ ते आर्थिक वर्ष २०२३–२४ चे अंतिम अचुक समायोजन कालावधीत चुकीने गणना केलेले energy balance वर परिणाम | द.ल.यु. | ३६३ |
| O | वीज खरेदी खर्चातील बचतीचे असमान वितरणाचे परिणाम | – | – |

**महावितरणने त्यांच्या पुनर्विलोकन याचिकेत खालील विनंती केल्या आहेत:**

i. वर नमुद केल्याप्रमाणे पुनर्विलोकन याचिका मंजूर करावी;

ii. पुनर्विलोकन याचिकेत सादर केल्याप्रमाणे, दिनांक २८.०३.२०२५ रोजीच्या बहुवर्षिय वीजदर आदेशात सुधारणा करावी व त्याचा परिणाम संबंधित वर्षांच्या एकुण महसूली गरजेमध्ये (ARR) व वीजदरामध्ये समाविष्ट करावी;

iii. अंतरीम काळात, मा. आयोगाकडून पुनर्विलोकन याचिकेवर निर्णय होईपर्यंत, बहुवर्षिय वीजदर आदेशाच्या अंमलबजावणीस स्थगिती द्यावी; आणि

iv. पुनर्विलोकन याचिकेमधील मुद्दे विचारात घेउन सदर प्रकरणाची तथ्ये व परिस्थिती विचारात घेउन योग्य व उचित वाटेल असे मा. आयोगाने पुढील आदेश किंवा निर्देश द्यावेत.

पुनर्विलोकन याचिका संबंधित दस्तऐवजासह महावितरणच्या https://www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून (विनामूल्य) डाउनलोड करता येईल.

खालील दस्तऐवजांच्या प्रती महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालय किंवा परिमंडळ कार्यालयातून लेखी विनंती अर्ज केल्यास मिळू शकतील.

क) पुनर्विलोकन याचिकेचे तपशीलवार दस्ताऐवज सीडी सहित (इंग्रजीमधील) ''महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित'' या नावाने डिडीद्वारे (मुंबई येथे देय असलेले) / धनादेश द्वारे / रोखीने **रु.१००/–** चे प्रदान केल्यानंतर.

ख) पुनर्विलोकन याचिकेचे तपशिलवार दस्ताऐवज (इंग्रजीमधील)– (रु.५०/– चे वरीलप्रमाणे प्रदान केल्यानंतर).

ग) पुनर्विलोकन याचिकेचे तपशिलवार दस्ताऐवजांची सीडी (इंग्रजीमध्ये)– (रु.५०/– चे वरीलप्रमाणे प्रदान केल्यानंतर).

या जाहिर सूचनेच्या प्रतिक्रियेत जनतेने आपल्या सूचना/ हरकती इंग्रजी व मराठी भाषेत लेखी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांच्या वेब प्रणालीवर **'ई–पब्लिक कन्सल्टेशन'** टॅबवर **(www.merc.gov.in /e-public-consultation)** नोंदवाव्यात. या विशिष्ट प्रणालीत प्रवेश करण्यात कोणतीही अडचण असल्यास मोबाईल नं. ८९२८०७१५२२ अथवा ई–मेल:– suggestions@merc.gov.in वर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या कार्यालयीन वेळेत संपर्क करावा.

ज्या व्यक्तीने वेब प्रणालीवर 'ई–पब्लिक कन्सल्टेशन' टॅबवर जाऊन आपल्या सूचना व हरकती लेखी स्वरुपात नोंदविल्या आहेत त्यांनी सदर सूचना व हरकती प्रत्यक्ष लेखी स्वरुपात (hard copy) देण्याची आवश्यकता नाही. ऑनलाईन वेब प्रणालीवर नोंद न करु शकलेल्या व्यक्तीने, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र.१, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई–४०० ००५ या पत्त्यावर लेखी स्वरुपात (hard copy) सुचना व हरकती दाखल करून व त्याच्या सोबत त्याची एक प्रत अधिक्षक अभियंता (वीजदर नियामक कक्ष), पाचवा मजला, प्रकाशगड, प्रोफेसर अनंत काणेकर मार्ग, प्लॉट नं.जी–९, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ (STD Code–०२२/६९८५२२००/६९८५३५३५ (कार्यालय)) यांना पाठविल्याचा पुरावा जोडण्यात यावा व तसेच सूचना / हरकती दाखल करु इच्छिणाऱ्या व्यक्तीने त्याचे संपुर्ण नाव, टपालाचा पत्ता, असल्यास ई–मेल पत्ता नोंद करावा. एखाद्या ग्राहक संघटनेच्या वतीने अथवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती दाखल करण्यात येत असल्यास तसे स्पष्ट नमुद करावे. दि. २७ डिसेंबर, २०२५ सायंकाळी ५.०० नंतर दाखल केलेल्या सुचना व हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच इतर मार्गाने दाखल केलेल्या सुचना व हरकती ग्राहय धरण्यात येणार नाही.

दि. २७ डिसेंबर, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या प्रत्येक सुचना / हरकती यांना महावितरण कडुन तीन दिवसात परंतु दिनांक दि. ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंत उत्तरे देण्यात येतील. महावितरण तर्फे देण्यात आलेल्या उत्तरावर ती व्यक्ती त्यांची प्रतिप्रश्न किंवा उत्तरे जाहिर सुनावणीच्यावेळी किंवा उशिरात उशिरा दि. १३ जानेवारी, २०२६ पर्यंत दाखल करु शकतील.

ज्या हरकतीदार किंवा सुचनाकारांनी वर नमुद केल्यानुसार आपल्या सुचना / हरकती दाखल केल्या आहेत व त्यांना ई–सुनावणी वेळेस प्रत्यक्ष हजर रहावयाचे असल्यास त्यांनी सुचना व हरकती मांडतांना कुठे हजर राहणार त्या ठिकाणाचा स्पष्ट उल्लेख करावा. अशा परिस्थितीत, आपला भ्रमणध्वनी क्रमांक व वैध ई–मेल आयडी याची माहिती देणे बंधनकारक राहिल.

ई–सुनावणीस सहभागी होणाऱ्यांनी मा. आयोगाने दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी निर्गमित केलेल्या "Operational procedure and protocol to be followed for e-hearing of the Petition before the Commission" या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे. तसेच, ज्या व्यक्तींना इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे ई–सुनावणीस भाग घेणे शक्य नाही, ते खालील तक्त्यातील ई–सुविधा केंद्रामध्ये भेट देऊन ई–सुनावणीमध्ये सहभागी होऊ शकतात व त्या संबंधित कोणतीही वेगळी सुचना देण्यात येणार नाहीत. मा. आयोग त्यांच्या स्वत:च्या अधिकारात अश्या व्यक्तींना / हरकतीदारांना जन ई–सुनावणीमध्ये बोलण्याची परवानगी देऊ शकते. व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे खालील प्रमाणे सुनावणी घेण्यात येतील.

| अ.क्र. | जाहीर सुनावणीकरीता ई–सुविधा केंद्रे | वेळ (सकाळी) | सुनावणीची तारीख |
|---|---|---|---|
| १ | **अमरावती :**<br>नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, अमरावती. | **१०.३० वा.** | **०२ जानेवारी, २०२६** |
| २ | **नागपूर :**<br>जिल्हा नियोजन समिती, सदर पोलिस ठाण्याच्या मागे, नागपूर. | **१०.३० वा.** | **०३ जानेवारी, २०२६** |
| ३ | **नवी मुंबई :**<br>कॉन्फरन्स हॉल, ७ वा माळा, सिडको भवन, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई. | **१०.३० वा.** | **०५ जानेवारी, २०२६** |
| ४ | **नाशिक :**<br>डीपीडीसी हॉल, नियोजन भवन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जुना आग्रा रोड, नाशिक. | **१०.३० वा.** | **०६ जानेवारी, २०२६** |
| ५ | **छत्रपती संभाजीनगर :**<br>एएससीडीएल मुख्यालय, ओसीसी हॉल, औरंगाबाद स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, छत्रपती संभाजीनगर. | **१०.३० वा.** | **०७ जानेवारी, २०२६** |
| ६ | **पुणे :**<br>मुख्य सभागृह (झुंबर हॉल), विधान भवन, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे. | **१०.३० वा.** | **०८ जानेवारी, २०२६** |

ठिकाण : मुंबई
तारीख: ०५ डिसेंबर, २०२५

**सही**
**संचालक (वाणिज्य)**
**महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या.**